## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

### निविदा सूचना

क्रमांक रातुमनावि/स्थाअ /२०११/ 2445

दिनांक १६ ऑगष्ट, २०११

दिनांक १६ ऑक्टोबर २०११ ते १५ ऑक्टोबर २०१२ या कालावधीकरीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांना माजी सैनिक सेवेतील सुरक्षा गार्डस् एकत्रित वेतनावर पुरवठा करण्यासाठी खालील बाबींची पूर्तता करणाऱ्या, तसेच विद्यापीठाच्या विहीत अटी व शर्ती मान्य असलेल्या सुप्रस्थापित सिक्यूरिटी एजन्सी कडून विहित नमुन्यातील प्रपत्रात निविदा मागविण्यात येत आहे.

०१ सिक्युरिटी एजन्सी ही केन्द्र किंवा राज्य शासनाद्वारे पंजीबद्ध असावी व त्यांचे लेबर लायसंन्स ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत वैध असावे. (लेबर लायसंन्सची प्रत सोबत जोडावी)

०२ सिक्युरीटी एजन्सीची आर्थिक स्थिती सबळ असावी. दिनांक १० ऑगष्ट, २०११ रोजी व निविदा सादर करते वेळी तसेच त्यानंतरही एजन्सीच्या बँक खात्यात रु. ५ लक्ष पेक्षा जास्त रक्कम असावी. ( १० ऑगष्ट, २०११ रोजीची संस्थेच्या खात्यातील शिल्लक बाबतचे बँक लेखा विवरणाची प्रमाणित प्रत सोबत जोडावी. )

०३ सिक्युरिटी एजन्सीचे स्वतंत्र कार्यालय असावे आणि त्यामध्ये दूरध्वनी व संदेशवहनाच्या सोई उपलब्ध असाव्यात. तसेच सुरक्षा गार्डसूच्या स्थळ तपासणीसाठी एजन्सीच्या मालकीची जीपगाडी किंवा इतर चार चाकी वाहन असावे.

०४ भविष्य निर्वाह निधी, आयकर, सेवाकर, व्यवसाय कर, कर्मचारी राज्य विमा योजना अंशदान आदि कर व इतर देय रकमेचा दिनांक ३० जून, २०११ पर्यंतचा भरणा केलेला असावा.

०५ निविदेत नमूद केलेले एकत्रित वेतन ( मुळ वेतन, विशेष भत्ता, भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा योजना अंशदान व सेवाकर इत्यादी सह ) शासनाने निर्धारीत केलेल्या एकत्रित किमान वेतनापेक्षा कमी नसावे.

०६ शासनाने निर्धारित केलेल्या एकत्रित किमान वेतनापेक्षा कमी वेतन नमूद करणारी निविदा अमान्य करण्यात येईल.

०७ सिलबंद लिफाफा क्रमांक १ मध्ये APPENDIX - II प्रपत्र आणि लिफाफा क्रमांक २ मध्ये APPENDIX - I-A, APPENDIX - I-B, Model form of Agreement, Tender Form प्रपत्र व संबंधीत दस्तएवज सादर करावेत.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या सिक्युरीटी एजन्सिने **कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर** यांच्या नावे असलेला रु. २०००/— (रुपये दोन हजार फक्त) राशीचा धनाकर्ष ( कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा ) स्थावर अधिकारी यांचे कार्यालयात सादर केल्यास, विहित नमुन्यातील निविदा प्रपत्र प्राप्त होऊ शकेल. निविदा प्रपत्र दिनांक १७ ऑगष्ट, २०११ ते २ सप्टेंबर, २०११ पर्यंत स्थावर अधिकारी यांचे कार्यालयातून कार्यालयीन वेळेत वितरीत होतील. सिलबंद निविदा त्याच ठिकाणी दिनांक २ सप्टेंबर, २०११ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. तसेच प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा दिनांक ३ सप्टेंबर, २०११ रोजी दुपारी १.०० वाजता विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर येथील मा. कुलसचिव कार्यालय येथे सर्वांसमक्ष उघडण्यात येतील.

निविदा उघडण्याच्या वेळी संबंधित कंत्राटदार किंवा त्यांचे प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतील. सदर कंत्राटासंबंधीच्या करारनाम्याच्या अटी व शर्ती, विहित नमुना निविदा प्रपत्रासह जोडण्यात आलेल्या आहेत. कोणत्याही कारणास्तव प्राप्त सर्व निविदा किंवा कोणतीही निविदा रद्दबादल ठरविण्याचे अधिकार विद्यापीठाला राहतील. तसेच विद्यापीठातर्फे नामित तपासणी समितीच्या अहवालानुसार कोणत्याही एजन्सीला वाटाघाटीकरिता बोलाविण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील.

कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ